# जाहिरात
## (अंगणवाडी मदतनीस भरती)

महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक एबावि-2022/प्र.क्र.94/का.6 दिनांक 02 फेब्रुवारी 2023 नुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजना, हया केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत बाल विकास प्रकल्प आधिकारी नागरी सांगली शहर या प्रकल्पांतर्गत रिक्त असलेली अंगणवाडी मदतनीस यांची मानधनी पदे सरळ नियुक्तीने ( By Nomination) भरण्यासाठी पात्र उमेदवारा कडून अर्ज मागणी करण्यात येत आहे शहर निहाय रिक्तपद संख्या पुढील प्रमाणे

| अनु क्र | अंगणवाडी क्षेत्राचे नाव | मदतनिस पदसंख्या |
|---|---|---|
| 1 | सांगली मिरज कुपवाड महानगर पालिका क्षेत्र सांगली | 8 |

**संदर्भात आवश्यक शैक्षणिक पात्रताअटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत**

| अ. क्र. | तपशील | अटी व शर्ती |
|---|---|---|
| 1 | पदाचे नाव | अंगणवाडी मदतनीस ( मानधनी सेवा ) |
| 2 | मानधन | अंगणवाडी मदतनीस एकत्रित रु 5500/- |
| 3 | शैक्षणिक पात्रता | अंगणवाडी मदतनीस पदासाठी महिला उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता 12 वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) शैक्षणिक अर्हता धरण करणाऱ्या उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेच्या आवश्यक कागदपत्रांच्या व गुणपत्राकांच्या सत्यप्रती सोबत जोडाव्यात. |
| 4 | वास्तव्याची (स्थानीक रहिवाशी असणे ) अट | महानगरपालिका क्षेत्रात मदतनीस पद रिक्त आहे या महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असलेल्या उमेदवारांना पात्र समजन्यात येईल.<br>स्थानीक रहिवाशी असले बाबत शासनाने निश्चित केलेला पुरावा सोबत जोडणे आवश्यक आहे. (आधार कार्ड ,रेशन कार्ड,तहसीलदार यांचे डोमीसाईल सर्टीफिकेट किंवा रहिवाशी प्रमाणपत्रा (तलाठी) सत्यप्रत जोडावी) तसेच उमेदवारांनी संबधीत महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असल्या बाबतचे स्वयंघोषणपत्रा सोबत जोडण्यात यावे. |
| 5 | वयाची अट | जाहिरात प्रसिध्दीच्या दिनांकास किमान 18 वर्षे पूर्ण व कमाल 35 वर्षे आणि विधवा उमेदवारांसाठी कमाल ४० वर्षे राहिल.( जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला किंवा दहावी प्रमाणपत्र) |
| 6 | लहान कुटूंब | १.उमेदवारास जास्तीत जास्त दोन हयात अपत्ये असावीत .<br>२.उमेदवारास दोन हयात अपत्या पेक्षा (दत्तक दिलेल्या अपत्यांसह ) अधिक अपत्य असल्यास उमेदवार नियुक्ती साठी पात्र ठरणार नाही . सदर बाब नियुक्ती नंतर निदर्शनास आल्यास उमेदावाराला सेवेतून तात्काळ सेवा मुक्त करण्यात येईल .तसेच सेवा कालवधी मध्ये त्यास दोन हयात अपत्य (दत्तक दिलेल्या अपत्यांसह ) असुन देखील तिसरे अपत्य झाल्यास त्याची सेवा समाप्त करण्यात येईल |

CamScanner

| | | |
|---|---|---|
| 7 | भाषेचे ज्ञान:- | ज्या अंगणवाडी केंद्रा करीता मदतनीसची नियुक्ती करावयाची आहे अशा अंगणवाडी मध्ये 50% पेक्षा जास्त मुले मराठी भाषा व्यतिरीक्त इतर भाषा (उदा.उर्दू,हिंदी, इ. पैकी एक भाषा) बोलणारी असतील तर अशा अंगणवाडी मध्ये मदतनीस यांच्या पदावर येथून पुढे सदर भाषेचे ज्ञान असलेलेची (लिहता व वाचता येणे) उमेदावाराची मदतनीस म्हणून नेमणूक करण्यात येईल.तथापी आशा उमेदावारानी इयत्ता १० किंवा १० वी पेक्षा जास्त शैक्षिणिक अर्हते पैकी किमान एक अर्हता मराठी भाषा विषयासह उत्तीर्ण असणे आवश्यक राहिल. |
| 8 | विधवा किंवा अनाथ उमेदवार बाबत | विधवा किंवा अनाथ उमेदवार असल्यास प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे.(सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र आवश्यक ) |
| 9 | बदली | अंगणवाडी कर्मचारी हे एकाकी पद असल्यामुळे अर्जदार स्थानिक रहिवाशी असावी केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेता अंगणवाडी कर्मचाऱ्यांना कोणतेही बदलीचे प्रावधान राहणार नाही. |
| 10 | प्रवर्ग | अनुसुचित जाती /अनुसुचित जमाती / इतर मागास प्रवर्ग / विमुक्त भटक्या जाती,जमाती / अर्थिक दृष्टया दुर्बल घटक / विषेश मागास प्रवर्ग या उमेदवारानी सक्षम प्राधिकाऱ्याची प्रमाण पत्राची साक्षांकीत प्रत सोबत जोडावी . |
| 11 | अनुभव | शासकीय यंत्रणेतील एकात्मिक बाल विकास सेवा योजने अंतर्गत अंगणवाडी सेविका /मदतनीस म्हणून कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास अनुभव प्रमाण पत्रा सोबत जोडावे. ( सक्षम प्राधिकाऱ्याची प्रमाण पत्राची साक्षांकीत प्रत सोबत जोडावी.) |
| 12 | **जाहिरात प्रसिध्दी** | १६/११/२०२३ |
| 13 | **अर्ज स्विकाराण्याचा अंतिम दिनांक** | अर्ज स्विकाराण्याचा अंतिम दिनांक - ०८/१२/२०२३ सायंकाळी ०६.१५ पर्यंत स्वीकारण्यात येईल .अंतीम दिनांका नंतर आलेल्या किंवा डाकेद्वारे (पोस्टाद्वारे ) विलंबाने पोहचलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही<br>**अर्ज स्विकारण्याचे ठिकाण** - बाल विकास प्रकल्प आधिकारी कार्यालय नागरी सांगली शहर यांचे कार्यालय ब्लॉक नं -०९ मध्यवर्ती प्रशासकीय इमारत विजय नगर सांगली . ई.मेल - sanglicdpo@gmail.com |
| 14 | **प्राथमिक यादी** | अर्ज स्वीकारण्याच्या शेवटच्या दिनांका पासून १५ दिवसात कार्यालयाचे नोटीस बोर्डवर यादी प्रसिध्द करण्यात येईल. |
| 15 | **यादीस हरकती** | यादीतील कोणत्याही उमेदवाराचे प्रमाणपत्र व त्या सोबतचे दिलेले गुण या बाबत तक्रार असल्यास अर्ज केलेल्या उमेदवारानी, प्राथमिक यादी कार्यालयात नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून पुढील १० दिवसात बाल विकास प्रकल्प आधिकारी कार्यालय नागरी सांगली शहर यांच्याकडे लेखी स्वरुपात तक्रार करता येईल. त्या नंतर प्राप्त झालेल्या तक्रारीची कोणत्याही परिस्थितीत दखल घेतली जाणर नाही. |
| 16. | **प्रतिक्षा यादी** | जर उमेदावर नियुक्ती आदेशाच्या दिनांका पासुन ३० दिवसांपर्यंत रुजु झाला नाही तर त्यास अपात्र ठरविण्यात आले तर प्रतिक्षा यादीतील उमेदवारास गुणानुक्रमांका नुसार नियुक्ती देण्यात येईल व सदर प्रतिक्षा यादी जाहीर झाल्या पासुन १ वर्षा पर्यंत वैध राहील. |
| 17 | **निवड प्रक्रिये विरुध्द तक्रार/ अपिल** | निवडी संदर्भत कोणत्याही उमेदवाराची त्यांच्यावर अन्याय झाल्याची तक्रार असल्यास निवड यादी घोषीत झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत मा.विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास,पुणे विभाग, पुणे यांच्याकडे तक्रार दाखल करता येईल त्या नंतर प्राप्त |

CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | झालेल्या तक्रारीचे कोणत्या ही परिस्थितीत दखल घेतली जाणार नाही. |
| 18 | **कागद पत्रांच्या प्रती** | अर्जा सोबत जोडलेल्या कागद प्रत्रांच्या प्रती सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकीत केलेल्या असाव्यात.(साक्षांकन राज पत्रीत आधिकारी किंवा माध्यमीक शाळांचे मुख्याध्यापक किंवा प्राचार्य किंवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांचे असावे.) |
| 19 | **अर्ज** | १.जाहीरातीमध्ये दिलेल्या विहित नमुन्यात अर्ज करावा. (अर्जात खाडाखोड / गिरवागिरवी करु नये.तसेच व्हाईटनरचा उपयोग करु नये असे अर्ज रद्द करणेत येतील.)अर्ज सादर करते वेळी सर्व आवश्यक कागदपत्र / प्रमाणपत्र घेतले जाणार नाही.<br>२.उमेदवारानी विबाह पूर्वीचे नाव व विवाहनंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असले बाबत राजपत्रा किंवा १००रु.चे स्टॅम्प पेपर वरील प्रतिज्ञापत्र या पैकी एक अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे.<br>३.अर्जदारानी नियुक्ती करीता कोणत्याही प्रकारचा प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव अणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल .<br>४. अंतीम दिनांका नंतर आलेल्या किंवा डाकेद्वारे (पोस्टाद्वारे) विलंबाने पोहचलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही<br>५.अंतीम निवड झालेल्या उमेदवाराला निवड झाले बाबत कळविण्यात येईल. इतर उमेदवाराना कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.<br>६.अंगणवाडी मदतनीस यांना शासन नियमानुसार दरमहा मानधन देय आहे.शासकीय नियमानुसार एकत्रित मानधनात वेळोवेळी करण्यात आलेली वाढ नियमानुसार अनुज्ञेय राहिल मात्र मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकराचे भत्ते सवलती अनुज्ञेय राहणार नाहीत.<br>७.अंगणवाडी मदतनीस हे एकत्रित मानधना वरील मानधनी स्वरुपाचे पद आहे.सदर पदास बदली ,सेवानिवृत्ती वेतन,वेतन वाढ इ.शासकीय सवलती अनुज्ञेय नाहीत. |
| 20 | निवड प्रक्रिया | शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे उमेदावारांच्या शैक्षणिक गुणपत्रिके मध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे ७५गुण ( १२वी,पदवीधर.पदव्युत्तर,डी.एड,बी.एड.व एम.एस.सी.आय.टी.यांचे एकत्रित कमाल ७५ गुण ) व अतिरिक्त २५ गुण ( विधवा किंवा अनाथा-१० गुण अनुसुचित जाती/जमाती-१० गुण ,इतर मागास प्रर्वग /विमुक्त जाती /भटक्या जमाती / अर्थिक दृष्टया दुर्बल घटक /विशेष मागास प्रवर्ग - ०५ गुण,अंगणवाडी सेविका /मदतनीस पदाचा २ वर्ष अनुभव असल्यास - ०५ गुण ) |
| 21 | पत्रव्यवहार | भरती प्रक्रिये संबधी अर्जदारास कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. सर्व सुचना जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती प्रमाणे असतील .सुधारीत सुचना असल्यास वेळोवेळी कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येतील. |
| 22 | सेवा समाप्ती साठी वयाची अट | सदर जाहीरातीद्वारे नियुक्त होणाऱ्या अंगणवाडी मदतनीस यांची सेवा वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत वा त्या शारिरीक दृष्टया काम करण्यास सक्षम नसल्यास या पैकी जे आधी घडेल तो पर्यंत सुरु राहील. |
| 23 | भरती प्रक्रिया | सदरील भरती प्रक्रियेत नमुद पद संख्येत बदल करण्याचा अथवा संपूर्ण भरती प्रक्रिया कोणत्याही टप्यावर रदद करण्याचा पूर्ण अधिकार बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सांगली शहर यांना राहील. |

CamScanner

अंगणवाडी मदतनीसची भरती प्रक्रिया ही महाराष्ट्र शासन ,महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक : एबावि-२०२२/प्र.क्र.९४/का.६ दिनांक ०२ फेब्रुवारी ,२०२३ मधील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येईल.

(विजयमाला माने-खरात )
बाल विकास प्रकल्प अधिकारी
नागरी सांगली शहर

CamScanner

# अर्जाचा नमुना

प्रति,
मा. बाल विकास प्रकल्प अधिकारी
(नागरी ) सांगली शहर.

| उमेदवाराचा सध्याचा पासपोर्ट साईज फोटो चिकटवा |
|---|

| उमेदवाराची स्वाक्षरी करावी |
|---|

विषय :- **अंगणवाडी मदतनीस पदासाठी अर्ज.**
संदर्भ - दैनिक वृत्तपत्र ------------- मधील दि. / /२०२३ ची जाहीरात

**अर्जदाराचे नावं :-** ----------------------------------------------------------------------------------

(विवाहापुर्वीचे संपूर्ण नावं) आडनावं प्रथम)

**विवाहानंतरचे संपूर्ण नावं (आडनावं प्रथम)** --------------------------------------------------------

**रहिवाशी पत्ता :-)** ---------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

उमेदवार विवाहीत / अविवाहीत आहे / नाही ) -------------------------------

दूरध्वनी/मोबाईल क्रमांक: ------------------------------------------------

ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नाव व अंगणवाडी क्रं ---------------------------------------------------

**जन्म दिनांक :-**

| दिनांक | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

**अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या तारखेला वय** :-

| दिवस | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

**अनुभव आहे काय ? :-** ---------------
(अंगणवाडी सेविका/मदतनीस /मीनी अंगणवाडी/ असलेस तपशिल)------------------------------------
अनुभव :- ---------------दिनांक ---------- पासून ------------पर्यंत
एकुण कालावधी ------- वर्ष ----- महिने ------ दिवस.
**जात व प्रवर्ग :-** -------------------------

**उमेदवार विधवा आहे काय?** -------------------------------------------------

CS CamScanner

**उमेदवार अनाथ आहे काय? -----------------------------------------------------**

उमेदवार स्थानिक रहिवाशी आहे काय? ---------------------------------------

उमेदवारास दोनपेक्षा कमी अपत्य असल्याचे प्रतिज्ञापत्र जोडले आहे/ नाही --------------- (परिशिष्ट ब अर्जासोबत जोडावे.)

**शैक्षणिक पात्रता-**

| अ.क्र | शिक्षण | वर्ष | कोणत्या बोर्ड/विद्यापिठातून उत्तीर्ण झाला | गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इयत्ता बारावी पास | | | | |
| 2 | पदवीधर | | | | |
| 3 | पदव्यूत्तर | | | | |
| 4 | डी.एड. | | | | |
| 5 | बी.एड | | | | |
| 6 | शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (MS-CIT) | | | | |

वरील संपूर्ण माहिती खरी असुन ती चूकीची अढळल्यास माझा अर्ज फेटाळला जाईल किंवा माझी निवड झाल्या नंतर ही माझी नियुक्ती कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा अधिकार सर्वस्वी नियुक्ती अधिकाऱ्यांना आहे याची मला पूर्ण जाणीव आहे तसेच जर माझी अंगणवाडी मदतनीस म्हणून निवड झाल्यास बाल विकास प्रकल्प अधिकारी नागरी सांगली शहर अंतर्गत महानगरपालिका निहाय देण्यात येणाऱ्या कोणत्याही अंगणवाडीवर मी काम करण्यास तयार आहे. लहान कुटुंबाचे प्रमाण पत्र सोबत जोडले आहे .

उमेदवाराची सही

नाव ( -------------------------- )

दिनांक - / / २०२३

CamScanner

# "परिशिष्ट ब"( प्रतिज्ञापत्र)

मी श्रीमती -----------------------------------------------------------------

श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------यांची पत्नी /मुलगी/

वय वर्ष --------------राहणार-------------------------------------------------------------------

याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करते की,

१) मी -------------------------पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

२)आज रोजी मला ---------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत या पैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ------ आहे

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे

| अ.क्र. | मुलाचे/मुलीचे नावं | जन्म तारीख | वय |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

उमेदवाराची सही

नाव ( ------------------------- )

दिनांक :-

ठिकाण :-

अर्जासोबत खालीलप्रमाणे साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडावीत :-

१.उमेदवारानी विवाह पूर्वीचे नाव व विवाह नंतरचे नाव या दोन्ही नावाची व्यक्ती एकच असल्याबाबत राजपत्र सत्यप्रत किंवा रु.१००/- चे स्टॅम्पपेपर वरील प्रतिज्ञा पत्र यापैकी एक

२.शाळा सोडल्याचा दाखला./ जन्म दाखला/10 वी प्रमाणपत्र यांची साक्षांकित प्रत

३.जातीचा दाखला(मागासवर्गीय असल्यास)

४. आधारकार्ड /रेशन कार्ड /तहसीलदार यांचे डोमीसाईल सर्टीफीकेट/रहिवाशी प्रमाणपत्र ( तलाठी) सत्यप्रत

५. उमेदवार संबधीत महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाशी असल्या बाबतचे स्वयंमघोषण पत्र

६. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र

७. विधवा/अनाथ(असल्यास)सक्षम अधिकाऱ्याचा दाखला

८. 12 वी उत्तीर्ण (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्याससमकक्ष)पदवीधर,पदव्युत्तर,डी.एड.,बी.एड.एम.एस.सी. आय.टी.गुणपत्रक, व प्रमाणपत्र यांच्या साक्षांकीत प्रती

९. अंगणवाडी सेविका /मदतनीस / मिनीअंगणवाडी सेविका म्हणून कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव असल्यास सक्षम प्राधिकाऱ्याचे अनुभव प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत

CamScanner